**ठळक बातम्या**

- पश्चिम आशियातल्या संघर्षाबाबत महत्त्वपूर्ण चर्चा करण्यासाठी केंद्रसरकारने बोलावली सर्वपक्षीय बैठक

- युद्ध थांबवण्यासाठी अमेरिकेचा इराणकडे १५ कलमी प्रस्ताव

- सुरक्षेवर अधिक लक्ष केंद्रित केल्यामुळे रेल्वे अपघातांमध्ये ९० टक्के घट झाल्याचं रेल्वे मंत्र्यांचं प्रतिपादन

- आगामी आर्थिक वर्षात भारताचा GDP वाढीचा दर ७ पूर्णांक १ दशांश टक्के राहील, असा एस अँड पी ग्लोबलचा अंदाज

**आणि**

- आदिवासी समाजासाठीच्या पहिल्या खेलो इंडिया क्रीडा स्पर्धांचं आज छत्तीसगडमधे उद्घाटन

**<><><><><>**

पश्चिम आशियात सुरू असलेल्या संघर्षावर चर्चा करण्यासाठी सरकारने आज संध्याकाळी सर्वपक्षीय बैठक बोलावली आहे. संसद परिसरात पत्रकारांशी बोलताना केंद्रीय मंत्री प्रल्हाद जोशी म्हणाले की, सद्यस्थितीवर विरोधी पक्षांशी चर्चा करण्यासाठी सरकारने ही बैठक बोलावली आहे. संकटाच्या काळात विधायक भूमिका बजावणं हे विरोधी पक्षांचंही कर्तव्य आहे, मात्र विरोधी पक्ष त्याचं राजकारण करत असल्याची टीका जोशी यांनी केली.

**होल्ड... बाईट -प्रल्हाद जोशी**

या बैठकीत पश्चिम आशियातल्या संकटावर चर्चा होईल आणि त्यात प्रत्येकाने आपला दृष्टिकोन मांडणं गरजेचं आहे, असं केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले म्हणाले.

दरम्यान, आज विरोधी पक्ष सदस्यांनी देशात सुरू असलेल्या गॅस टंचाईवरून संसद परिसरात निदर्शनं केली. यात काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या सुप्रिया सुळे, सपाचे धर्मेंद्र यादव आणि अन्य काही पक्षाचे नेते सहभागी झाले होते. ‘रिकामं सिलिंडर, पोकळ आश्वासनं’ अशी घोषणाबाजीही यावेळी करण्यात आली.

**<><><><><>**

कोविडनंतरच्या काळात देशभरात सुमारे १ हजार २४ नवीन रेल्वे गाड्या सुरू करण्यात आल्याची माहिती रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज लोकसभेत प्रश्नोत्तराच्या तासात पुरवणी प्रश्नाच्या उत्तरात दिली. तिकीट आरक्षणाची प्रक्रिया सुरळीत करण्यासाठी आणि फसवणूक रोखण्यासाठी रेल्वेने अनेक उपाययोजना केल्या आहेत, असं ते म्हणाले..

**होल्ड.. बाईट - अश्विनी वैष्णव**

रेल्वे मार्गांच्या सुरक्षेसाठी सरकार १ लाख २० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक करत असून सुरक्षेवर अधिक लक्ष केंद्रित केल्यामुळे रेल्वे अपघातांमध्ये ९० टक्के घट झाली आहे,असं रेल्वे मंत्री यावेळी म्हणाले.

देशाची सौर मॉड्युल उत्पादन क्षमता सध्या १७२ गिगावॅटपर्यंत वाढल्याची माहिती केंद्रीय नवीन आणि नवीकरणीय उर्जा मंत्री प्रल्हाद जोशी यांनी आज लोकसभेत प्रश्नोत्तराच्या तासात दिली.

सेमीकंडक्टर निर्मितीत लागणाऱ्या पर्मनंट मॅग्नेटसारख्या दुर्मीळ खनिजांची देशांतर्गत उत्पादन क्षमता वाढवण्यासाठी सरकारने निर्णायक पावलं उचलायला सुरुवात केल्याचं केंद्रीय राज्यमंत्री डॉ. जितेंद्र सिंह म्हणाले. लोकसभेत प्रश्नोत्तराच्या तासात एका प्रश्नाचं उत्तर देताना ते म्हणाले की, आतापर्यंत ही खनिजं ८० टक्के आयात केली जातात. मात्र, आत्मनिर्भर भारताच्या वाटचालीत सरकार उत्पादन वाढवण्याचा प्रयत्न करत आहे.

लोकसभेत आज अर्थमंत्री निर्मला सीतारामन वित्त विधेयक २०२६ वरच्या चर्चेला उत्तर देत आहेत. दिवाळखोरी संहिता सुधारणा विधेयक, २०२५ वर देखील आज लोकसभेत चर्चा होईल. या विधेयकाच्या माध्यमातून दिवाळखोरी संहिता, २०१६ मध्ये सुधारणा करण्यात येणार आहे. तर राज्यसभेत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा केंद्रीय सशस्त्र पोलिस बल सामान्य प्रशासन विधेयक २०२६ सादर करणार आहेत.

दरम्यान, लोकसभेत काल ट्रान्सजेंडर अर्थात पारलिंगी व्यक्ती हक्क संरक्षण सुधारणा विधेयक मंजूर झालं. यानुसार, एखादी पारलिंगी व्यक्ती स्वतःची ओळख पटवणारं प्रमाणपत्र मिळवण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांकडे अर्ज करू शकते. वैद्यकीय मंडळाच्या शिफारशीची तपासणी केल्यानंतरच जिल्हाधिकारी हे प्रमाणपत्र जारी करतील. पारलिंगी व्यक्तींना जन्मदाखल्यात किंवा इतर अधिकृत कागदपत्रांमधलं स्वतःचं नाव बदलण्याचा अधिकार या विधेयकातून मिळेल.

<><><><><>

देशात इंधनाची कमतरता नसल्याचा निर्वाळा भारत पेट्रोलियम आणि हिंदुस्थान पेट्रोलियमनं आज दिला. एलपीजी, कच्चे तेल,पेट्रोल, डिझेल आणि विमानाच्या इंधनाचा पुरेसा साठा उपलब्ध असून पुरवठा साखळी सुरळीत आहे, असं समाज माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे. गेल्या काही दिवसांपासून देशात इंधनाचा तुटवडा असल्याच्या बातम्या पसरत असून त्या पूर्णपणे निराधार आहेत. नागरिकांनी घाबरून जाऊन इंधनाचा साठा करून ठेवू नये असा सल्लाही त्यांनी दिला आहे.

दरम्यान, प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेअंतर्गत तसंच इतर योजनांतंर्गत दिल्या जाणाऱ्या एलपीजी सिलेंडरच्या नोंदणीचा कालावधी वाढवल्याच्या बातम्या समाज माध्यमावर प्रसारित होत आहे. मात्र या बातम्या खोट्या आणि निराधार असल्याचं स्पष्टीकरण पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयानं दिलं आहे. शहरी भागात

सिलेंडर नोंदणीसाठी २५ दिवस तर ग्रामीण भागात ४५ दिवसांचा कालावधी कायम असून त्यात कोणताही बदल केलेला नाही.नागरिकांनी या अफवांवर विश्वास ठेवू नये, असं आवाहनही मंत्रालयानं केलं आहे.

**<><><><><>**

पश्चिम आशियात गेल्या २८ फेब्रुवारीपासून सुरु झालेल्या संघर्षाचा आज २६वा दिवस आहे. युद्ध थांबवण्यासाठी आणि इराणचा आण्विक कार्यक्रम नष्ट करण्यासाठी अमेरिकेने १५ कलमी प्रस्ताव इराणकडे पाठवला आहे. इराणने होर्मुझ सामुद्रधुनी पूर्णपणे खुली करावी, इराणमधली ३ अणुशक्ती केंद्र बंद करावी तसंच युरेनियम मशागत थांबवावी या अटींचा त्यात समावेश आहे. स्थानिक दहशतवादी गटांना वित्त आणि शस्त्र पुरवठा थांबवावा, तसंच सेनादलांचा वापर केवळ स्वसंरक्षणासाठी करण्याचं वचन द्यावं, असं या मसुद्यात म्हटलं आहे. इराण हा तह करायला तयार होईल असं अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांनी म्हटलं आहे.

दरम्यान पेंटागॉन या अमेरिकेच्या संरक्षण मुख्यालयानं पश्चिम आशियात आणखी दोन हजार सैन्यबळ पाठवण्याचे आदेश जारी केले आहेत. इराणच्या बुशहर अणुशक्ती केंद्रावर काल हल्ला झाला.

दरम्यान प्रत्यक्ष युद्धग्रस्त क्षेत्रात अद्यापही परस्परांवर हल्ले सुरु आहेत. इस्राएलने दक्षिण लेबनॉनमधे हल्ले केले असून लिटानी नदीपर्यंतच्या भूभागावर सुरक्षेच्या दृष्टीनं कब्जा मिळवण्याची तयारी केली असल्याचं त्यांचे संरक्षण मंत्री इस्राएल कात्झ यांनी सांगितलं. इस्राएलने बैरुटवर केलेल्या हल्ल्यात २ नागरिकांचा मृत्यू झाला, तर ५ जण जखमी झाले. युद्धग्रस्त भागात मानवतावादी मदत पोहोचवणं देखील अवघड झालं असल्याचं स्थानिक प्रशासनानं सांगितलं. इराणने सर्वोच्च राष्ट्रीय सुरक्षा मंडळाचे सचिव अली लारिजानी यांना हटवून बाघेर ज़ोलगाद्र यांची नेमणूक केली आहे. इराणने इस्राएलवर केलेल्या ड्रोन आणि क्षेपणास्त्र हल्ल्यांमधे तेल अवीवमधे ६ जण जखमी झाले.

**<><><><><>**

पश्चिम आशियात सुरू असलेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर, भारताचा २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी सकल देशांतर्गंत उत्पादन अर्थात GDP चा दर ७ पूर्णांक १ दशांश टक्के राहील, असा अंदाज स्टँडर्ड अँड पुअर्स ग्लोबलनं प्रसिद्ध केलेल्या अहवालात व्यक्त केला आहे.

भारत जगातल्या सर्वात वेगाने वाढणाऱ्या मोठ्या अर्थव्यवस्थांपैकी एक राहील. जागतिक स्तरावर ऊर्जा किंमतींमध्ये अस्थिरता कायम असली तरी महागाई दर नियंत्रणात राहून तो सुमारे ४ पूर्णांक ३ दशांश टक्क्यांपर्यंत राहील, असा अंदाज अहवालात व्यक्त केला आहे.

**<><><><><>**

भारतीय न्याय संहिता महाराष्ट्र सुधारणा विधेयक २०२६ आज विधानसभेत एकमताने मंजूर झालं. ॲसिड हल्ल्यातील पीडितेचं नाव उघड करू नये तसंच डिजिटल माध्यमांवर महिलेची बदनामी केली तर तो विनयभंग समजला जाईल अशा तरतुदी या विधेयकात आहेत.

विदर्भातल्या प्रत्येक जिल्ह्यात व्याघ्र प्रकल्प उभारण्याचा निर्णय सरकारने घेतल्याचं वनमंत्री गणेश नाईक यांनी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात सांगितलं.

मुंबईच्या एशियाटिक सोसायटीची प्रलंबित निवडणूक येत्या २ ते ३ महिन्यात पारदर्शक पद्धतीनं घेतली जाईल, असं आश्वासन मंत्री आशिष जैस्वाल यांनी विधानपरिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात दिलं.

**<><><><><>**

गुजरात विधानसभेने समान नागरी कायदा विधेयक काल मंजूर केलं. यामुळे देशात समान नागरी कायदा लागू करणार गुजरात हे उत्तराखंड नंतरचे दुसरं राज्य ठरले आहे .

**<><><><><>**

आदिवासी समाजासाठीची पहिली खेलो इंडिया क्रीडा स्पर्धा आजपासून छत्तीसगडमधे सुरू होत आहे, ती ३ एप्रिल पर्यंत चालेल .केंद्रीय क्रीडा आणि युवक कल्याण मंत्री मनसुख  मांडविय  यांच्या हस्ते आज संध्याकाळी रायपूर इथं या स्पर्धांच उद्घाटन होणार आहे.

**//<><><><><>//**